नियमित फौजदारी खटला नं. ५५१/२०२४
निशाणी- २६

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,

माझे नांवः- संकेत विजय भारस्कर,

वयः- २६वर्षे, धंदाः खाजगी नोकरी

राहणार- सिध्दार्थ नगर, अहमदनगर

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. सिमा शेख यांचेकडूनः-

१. दिनांक २२/०२/२०२४ रोजी पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी सिध्दार्थनगर येथे बोलावले होते. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले. घटनास्थळ बालीकाश्रम रोडच्या आतमध्ये सिध्दार्थनगर, आंबेडकर यांच्या कमानीजवळ, मुळ फिर्यादीच्या घरासमोर होते. पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. तसेच फिर्यादीने दिलेले कपडे माझ्यासमक्ष जप्त केले. ते कपडे मला दाखविल्यास मी ते ओळखू शकतो. मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच असून तो माझ्यासमक्ष पोलिसांनी केला आहे. त्यातील नकाशा बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

२. तसेच पोलिसांनी माझ्यासमक्ष फिर्यादीकडून कपडे जप्त केले होते व त्याबाबत जप्ती पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला होता. मला दाखविण्यात आलेले कपडे तेच असून त्यास वस्तू क्र. अ देण्यात आले आहे. मला दाखविण्यात आलेला टॉप तोच आहे. तो बाह्यांवर व समोरच्या बाजूने फाटला आहे. जप्त टॉपच्या लिफाफ्यावर माझ्या सहीचे लेबल आहे. याबाबत मला दाखविण्यात आलेले घटनास्थळ / जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. २७ देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम. एस. सय्यद यांचेकडूनः-</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, राहुल छबूराव लोखंडे हा फिर्यादीचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो माझा जुना मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, राहुलने बोलावल्यामुळे मी तेथे आलो. हे म्हणणे खरे आहे की, राहुलने मला पंच म्हणून रहाण्याकरिता व पंचनाम्यावर सही करण्याकरिता सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मी आज सुध्दा न्यायालयात राहुल सोबतच आलो. हे म्हणणे खरे आहे की, राहुलने सांगितल्या प्रमाणेच मी आज साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी तयार पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला मदत करण्यासाठी आज रोजी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.29 16:17:14 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. २९/०४/२०२६.
अहमदनगर.